२९१ क्रमांक/जिप/शिक्षण/खाप्राशा/ /२०१८
शिक्षण विभाग (प्राथ)जिल्हा परिषद,अमरावती
दिनांक- १५।३।१८

**प्रति,**

अध्यक्ष/सचिव

लेट पी.के.देशमुख मल्टीपर्पज सोसायटी अमरावती.

**विषय**:- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ**:-

१. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्रं.एसएमएस२०१७/प्रक्र.६५८/ एसएम-२/ मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक १७ ऑक्टोबर २०१७.

२. मा.शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती यांचे आदेश क्र.प्राथ/क/२३९१२ दि.२६-१२-२०१७.

वरील विषयी आपणास कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये **नवीन शाळा स्थापन करणेकरीता /विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता** प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार **नवीन शाळा स्थापना करणेकरिता/विद्यमान शाळेला प्रथम खाते मान्यता** खालील अटी व शतींवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | परवानगी मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्य वर्ग/ इयत्ता | परवानगी चे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | अध्यक्ष/सचिव लेट पी.के. देशमुख मल्टीपर्पज सोसायटी अमरावती. | विजया स्कुल फॉर एक्सिलंस मोजे अकोली जि. अमरावती | इंग्रजी | नविन शाळा (सिबीएसई) | इयत्ता- १ ते १२ वी | २०१७-१८ |

**अटी व शर्ती :-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम २००९ मधील तरतुदीची पुर्तता करुन सन २०१७-१८या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालील प्रमाणे परवांनगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

(अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबीची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महीण्याच्या आंत प्रथम मान्यतेसाठी संबधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

(ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करीता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा व्यवस्थापन पुर्तता करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबीची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासुन अठरा महीण्याच्या आंत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवांनगी आपोआप रद्दबातल ठरेल.

३. परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळेस (१) शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या अदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच (२) महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ ०१) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

५. यु-डायस डाटा-शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा बाबत U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना "स्वयं अर्थसहाय्यित शाळा " म्हणुन नोंद करावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा" असा जाहीर फ लक शाळेच्या बाहे प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम , २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसूचना, शासन निर्णय, शासन परीपत्रक इ. मधील तसेच यापुढे या संबंधीत शासनाच्या वेळोवेळी निर्गमिकत करण्यात येणाऱ्या पुढील आदेशांचे पालन करणे. त्याचप्रमाणे भौतिक सुविधा उपलब्ध करुण देण्याची जबाबदारी संबंधित शाळांच्या संस्था चालकांवर राहील.

७. संबंधित शैक्षणिक संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थासोबत (जिल्हा परिषद,/महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदा/कटक मंडळे इ.) सामज्यस करार (MOU) करणे बंधनकारक राहील. अशा करारपत्रची प्रत शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर करावी.

८. एका मुलासाठी, एका वर्षासाठीचे शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ नुसार निर्धारीत केलेले असावे.

९. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

१०. संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

११. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदी व त्याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

(आर.डी.तुरणकर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अमरावती.

प्रतिलीपी,

मा शिक्षण उप संचालक अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस सविनय सादर.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अमरावती.